॥ सोऽहम् ॥

## प. पू. स्वामी स्वरुपानंद कनिष्ठ महाविद्यालयीन आंतरराज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२५

वर्ष १७ वे सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५

### स्पर्धेचे विषय (कनिष्ठ महाविद्यालय)

१. आणिकांचे दोष आणी ना जो मनीं।
गुणांतें वाखाणी तो चि संत ॥३॥
लोककल्याणार्थ वेंची जो जीवित ।
संत तो महंत स्वामी म्हणे ॥४॥
॥अभंग ८६॥

२. संतांची शिकवण आणि विश्वबंधुत्वाकडे वाटचाल

३. विश्वगुरू भारतासमोरील आव्हाने

### वैयक्तिक रोख बक्षिसे

१.प्रथम क्रमांक : रु. ७०००/-

२.द्वितीय क्रमांक : रु. ५०००/-

३.तृतीय क्रमांक : रु. ३०००/-

४. उत्तेजनार्थ (दोन बक्षिसे) : प्रत्येकी रु.१०००/-

सांघिक विजेत्यांना : भव्य चषक, प्रमाणपत्र,
विजेत्या संघाचे मार्गदर्शकास प्रशस्तीपत्र

### स्पर्धेचे ठिकाण

नगराध्यक्ष रंगमंच, राधाबाई शेट्ये सभागृह,
गोगटे जोगळेकर महाविद्यालय (स्वायत्त),
ॲड. एन्. व्ही. जोशी पथ, जिल्हा न्यायालयाच्या शेजारी,
रत्नागिरी ४१५६१२

॥ सोऽहम् ॥

## प. पू. स्वामी स्वरुपानंद वरिष्ठ महाविद्यालयीन आंतरराज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२५

वर्ष २३ वे सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५

### स्पर्धेचे विषय (वरिष्ठ महाविद्यालय)

१. पहावें तें दिसे दर्पणीं साचार ।
आपुला आचार ओळखावा ॥४॥
स्वामी म्हणे होसी सर्वथैव जाण ।
तुझा तूं कारण सुख- दुःखा ॥५॥
॥अभंग ३५॥

२. सोशल मीडिया - सुसंवाद की विलगीकरण

३. ऑपरेशन सिंदुर आणि भारताचा वाढता दरारा

### वैयक्तिक रोख बक्षिसे

१.प्रथम क्रमांक : रु. ७०००/-

२.द्वितीय क्रमांक : रु. ५०००/-

३.तृतीय क्रमांक : रु. ३०००/-

४. उत्तेजनार्थ (दोन बक्षिसे) : प्रत्येकी रु.१०००/-

सांघिक विजेत्यांना : भव्य चषक, प्रमाणपत्र,
विजेत्या संघाचे मार्गदर्शकास प्रशस्तीपत्र

### स्पर्धेसाठी संपर्क

प्राचार्य, डॉ. मकरंद साखळकर
संपर्क : ९४२३०२२६४९

**स्पर्धा संयोजक**

प्रा. सौ. मानसी गानू : ७०८३१११४७९
प्रा. कृष्णात खांडेकर : ९४२११२१९८०६
प्रा. अभिजित भिडे : ९५२७४५७२६५
email : swamiswaroopanand2020@gmail.com

॥ सोऽहम् ॥



## स्वामी स्वरुपानंद सेवा मंडळ, पावस

पुरस्कृत

प. पू. स्वामी स्वरुपानंद

वरिष्ठ / कनिष्ठ महाविद्यालयीन आंतरराज्यस्तरीय

# वक्तृत्व स्पर्धा

सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५

भारतीय सौर २४ अग्रहायण १९४७

**आयोजक**

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे,

**गोगटे-जोगळेकर वरिष्ठ महाविद्यालय (स्वायत्त)**

आणि

**अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय**

रत्नागिरी ४१५६१२ (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०२३५२) २२१३११ / ७५८८२६४३४८
ई-मेल : gjcrtn@gmail.com
वेब साईट : htttps://gjcrtn.ac.in

## ॥ सोऽहम् ॥

स.न.वि.वि.

राज्यातील तरुण पिढीची सांगड अध्यात्म, नैतिकता आणि समाजविकास या प्रश्नांशी घालावी या उद्देशाने स्वामी स्वरुपानंद सेवा मंडळ, पावस यांनी आंतरराज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा पुरस्कृत केली आहे. कोकणातील अध्यात्मिक संतश्रेष्ठ परमपूज्य स्वामी स्वरुपानंद यांनी लावलेल्या ज्योतीला तेवत ठेवणाऱ्या स्वामी स्वरुपानंद सेवा मंडळाने ही स्पर्धा आयोजित करण्याची जबाबदारी नॅक द्वारा **अ** दर्जाने पुनर्मानांकित केलेल्या **गोगटे-जोगळेकर महाविद्यालय (स्वायत्त)** यांच्याकडे दिली आहे. जून २०२३ पासुन गोगटे जोगळेकर महाविद्यालय स्वायत्त झाले असुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अवलंब करण्यात आला आहे. स्पर्धसंदर्भातील सविस्तर माहिती या पत्रकात देण्यात आली आहे. तरी आपल्या महाविद्यालयाचा संघ पाठवून स्पर्धा यशस्वी करावी ही विनंती.

**प्राचार्य, डॉ. मकरंद साखळकर.**

---

## ॥ सोऽहम् ॥

### प. पू. श्रीमत् स्वामी स्वरुपानंद

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सक्रीय सहभाग घेतल्यामुळे कारावासाची शिक्षा भोगलेले श्री. रामचंद्र विष्णू गोडबोले यांनी नाथ संप्रदायाची सोऽहम् साधना करून अध्यात्मिक क्षेत्रात अद्वितीय उंची गाठली. आत्मसाक्षात्कार संपन्न झाल्याने ते स्वामी स्वरुपानंद झाले. संत ज्ञानेश्वरांच्या प्राचीन मराठी भाषेतील सर्व अध्यात्मिक ग्रंथांचा स्वामीजींनी आजच्या मराठी भाषेत प्रासादिक अनुवाद केला. अभंग ज्ञानेश्वरी या त्यांच्या उत्कृष्ट ग्रंथामुळे स्वामीजींची संत भाषेतील थोरवी व्यक्त झाली. ज्ञानदेवांच्याच परंपरेतील आणि ज्ञानदेवांचा अध्यात्मिक वारसा पुढे चालविणारे स्वामी साक्षात्कारी संत आहेत. पावस हे स्वामीजींचे जन्मगांव. १५ डिसेंबर १९०३ या दिवशी स्वामींचा जन्म झाला. अध्यात्मिक सेवेचे आणि मानवी सेवेचे त्यांचे कार्य येथेच घडले. त्या वेळी स्वामीजी भक्तशिरोमणी श्री. भाऊराव देसाई यांच्या कुटुंबियांच्या वास्तूत रहात होते. परमशांत स्वभाव आणि अखंडित प्रसन्नता लाभलेल्या स्वामीजींनी अनेकांना 'सोऽहम्' साधनेची दीक्षा देऊन त्यांच्या मनाला आनंद व शांती मिळवून दिली. त्यांचे उपदेशपर ग्रंथ व अभंग रचना, विचलीत झालेल्या मनाला स्थैर्य आणि उमेद प्राप्त करून देतात. राज्यात आणि देशात सर्वत्र स्वामीजींचे भक्त आहेत. १५ ऑगस्ट १९७४ रोजी स्वामीजींनी पावस येथे समाधी घेतली. समाधीस्थानी भव्य मंदिर उभारलेले असून ''या ठिकाणी माझे चैतन्य स्वरुपात वास्तव्य आहे'' असे आश्वासन स्वामीजींनी भक्तांना देऊन ठेवलेले आहे.

**स्वामी स्वरुपानंद सेवा मंडळ :** या स्पर्धेचे पुरस्कर्ते स्वामी स्वरुपानंद सेवा मंडळ, ही नोंदणीकृत संस्था असून त्यांचे सुमारे १२०० सभासद आहेत. विद्यमान कार्याध्यक्ष आणि कार्यवाह आपल्या सर्व सहकाऱ्यांसोबत स्वामींच्या सेवेत मग्न असून, मंडळामार्फत खालील उपक्रम राबविले जातात.

१. पंचक्रोशीतील गरीब शालेय विद्यार्थ्यांना आर्थिक मदत
२. भक्तनिवासाद्वारे स्वामींच्या भक्तांची पावस येथे निवास व्यवस्था
३. स्वामी मंदिराचे व्यवस्थापन
४. पंचक्रोशीतील रुग्णांसाठी स्थिर व फिरत्या स्वरुपाची मोफत वैद्यकीय सेवा.
५. विद्यार्थ्यांसाठी संस्कारक्षम स्पर्धा
६. अखंड नामस्मरण व धार्मिक ग्रंथांचे पारायण
७. स्वामींच्या साहित्याची प्रसिद्धी व अल्पदरात वितरण
८. पावस ते पंढरपूर दिंडी सोहळा

| ऋषिकेश जयंत पटवर्धन | जयंत रघुनाथ देसाई |
|---|---|
| **कार्यवाह** | **कार्याध्यक्ष** |

---

**॥ ॐ राम कृष्ण हरि ॥**

**सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५**

**स्पर्धेविषयी :**

**सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५** रोजी सकाळी, ९ वाजता स्पर्धेचे उद्घाटन होईल व ९.३० वा. पासून स्पर्धा घेण्यात येईल. बक्षिस वितरण त्याच दिवशी **दुपारी ३.००** वा **मा.डॉ.प्रफुल्लदत्त कुलकर्णी, रत्नागिरी** यांचे शुभ हस्ते करण्यात येईल. सांघिक चषक जिंकण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाचा तीन जणांचा संघ येणे गरजेचे आहे. प्रवेशिका पाठविण्याची अंतिम तारीख, **दि.१० डिसेंबर २०२५** ही आहे.

**स्पर्धेचे नियम :**

१. स्पर्धा केवळ मराठी माध्यमातूनच होईल.
२. प्रत्येक महाविद्यालयाला ३ स्पर्धकांचा १ संघ पाठविता येईल.
३. वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धकाचे वय २५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.
४. कनिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धकाला विषय मांडण्यासाठी ६+२ असा एकूण ८ मिनिटे वेळ असेल.
५. वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धकाला विषय मांडण्यासाठी ७+३ असा एकूण १० मिनिटे वेळ असेल.
६. स्पर्धकाने स्पर्धेवेळी महाविद्यालयाचे ओळखपत्र आणणे बंधनकारक आहे.
७. स्पर्धकाची भोजन व्यवस्था स्पर्धेच्या ठिकाणी केली जाईल.
८. निवास व्यवस्थेची आवश्यकता असल्यास आधी कळविल्यास आयोजकांमार्फत करण्यात येईल.
९. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.
१०. परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.
११. गतवर्षीच्या प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धकास स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.
१२. रजिस्ट्रेशनच्या लिंकवरून फॉर्म भरताना त्यातील नमूद केलेली माहिती प्रमाणपत्रावर छापली जाणार असल्याने अतिशय काळजीपूर्वक भरावी.
१३. स्पर्धकाचे नाव, महाविद्यालयाचे नाव देवनागरीमध्येच भरावे.
१४. प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी आपण आपल्या या वर्षीच्या आय कार्ड व प्राचार्यांच्या संमतीपत्राची डिजीटल कॉपी तयार ठेवा.

---

**वरिल क्यू आर कोडचा वापर करुन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी Whats app Group मध्ये Join व्हा.**